माझे आवडते रणगीत

कु. रोहिणी गोडबोले, १०-क

सैन्य हे चालते पोटावर- पण लढते भावनेवर! अन् ही भावना- हा जोष निर्माण करण्यासाठी, सैन्याला दुःखाचा, कष्टाचा विसर पडावा म्हणून जी गीते गायली जातात ती रणगीते होत. आजपर्यंत अनेक लढायांच्या वेळी, अनेक भाषांमधून, अनेक रणगीते रचली गेली आहेत, गायली गेली आहेत. महाराष्ट्रात 'थू: तुमच्या जिनगानीवर' सारखे पवाडे गाऊन मराठे लोकांच्या अंतःकरणातील राष्ट्रप्रेमाची सुप्त ज्वाला चेतविली गेली. ४२ च्या लढ्यात 'तकली चला-चलाके लेंगे स्वराज्य लेंगे' यासारखी अनेक गीते गायली गेली. आज ती तुम्हा आम्हाला रणगीते वाटणार नाहीत— क्रांतिगीते वाटतील! पण तो भारतीय स्वातंत्र्याचा लढा जसा अभूतपूर्व होता तशीच ती रणगीतेही वेगळी होती. शस्त्रविहीन लढ्याची शस्त्रविहीन रणगीते होती ती! जवानांच्या शौर्याचे वर्णन त्यात नसेल- पण ती क्रांतिवीरांची गाथा होती. त्यात क्रांतिवीरांना नमन करून जे क्रांतीला भिऊन घरात बसतात त्यांना क्रांतिप्रवण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या रणगीतांचे स्वरूप स्फूर्तिगीतांचे होते. या गीतांपैकी माझे आवडते रणगीत म्हणजे 'क्रांतीचा जयजयकार' हे होय. ज्या रणगीताने अनेक क्रांतिवीरांना स्फूर्ति दिली-अनेकांना क्रांतिप्रवण केले असे हे कवि कुसुमाग्रजांचे गीत!

दुसरी अनेक रणगीते आहेत, परंतु यातील कल्पनाच वेगळी आहे. कल्पना अशी-की उद्या फाशी जाणारा क्रांतिवीर आपल्या मागील लोकांना स्फूर्ती देऊन, क्रांतीचा संदेश देऊन, आपल्या आईला अखेरचा प्रणाम करीत आहे.

तो क्रांतीला भिऊन घरात बसणाऱ्यांना म्हणतो, 'अरे, या भिऊ नका. ही क्रांती फार महान आहे. हिचा जयजयकार करा. मरणाची- शृंखलांची कशाचीही तमा करू नका. तो म्हणतो-

'गर्जा जयजयकार क्रांतिचा-गर्जा जयजयकार।
अन् वज्राचे छातीवरती घ्या झेलून प्रहार॥

हा क्रांतिवीर अतिशय निर्भय, स्थितप्रज्ञ आहे. तो स्वतः होऊन संकटांना आव्हान करतो. ब्रिटिश पाशवी सत्तेला उद्देशून तो म्हणतो,

'सर्पांनो! उद्दाम आवळा कसूनिया पाश।'

त्याने फार तर तुम्ही आमची प्राणज्योत विझवू शकाल. परंतु देशाचा अणूरेणू तेजाळून उठलेली ही ज्योत तुम्ही विझवू शकणार नाही. त्याच्याच पुष्ट्यर्थ तो म्हणतो, 'तडिताघाते कोसळेल का तारांचा संभार?' आमचे प्राण जातील पण आमच्या अंतरीची निष्ठा, आवेश अभंग राहील. आम्हाला कारागाराच्या भिंतींची क्षिती नाही. कारण यशवंतांनी म्हटलेच आहे-

'वाढु दे कारागृहाच्या भिंतीची उंची किती
मन्मना नाही क्षिती॥

आम्हाला भुकेची तमा नाही वा शृंखलांची पर्वा नाही; जे मातेच्या शृंखला तोडण्यास बाहेर पडले त्यांना या बेड्यांची काय तमा!

या क्रांतिवीराला कशाचीच भीती वाटत नाही. हा लढा मोठा विचित्र आहे. एका बाजूस अद्ययावत शस्त्रास्त्रे व पैसा यांनी सुसज्ज असलेले मोठे थोरले ब्रिटिश साम्राज्य व दुसऱ्या बाजूस शस्त्रहीन, वित्तहीन असे हे क्रांतिकारक ! पण त्यांच्याजवळ एक वेगळीच गोष्ट आहे. ती म्हणजे निष्ठा– अभंग निष्ठा ! मातृभूमीवरील प्रेम ! आपल्या मातेला सोडविण्यापुढे त्यांना आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या पाशवी सत्तेची पर्वा वाटत नाही. जे ४० कोटी अर्धपोटी लोकांना पोटभर अन्न मिळवून देण्यासाठी बाहेर पडले त्यांना स्वतःच्या भुकेची काय तमा ! जे स्वतः मृत्युंजय आहेत– त्यांना मृत्यूची कसली भीती असणार ? ते म्हणतात,

'बलशाली मरणाहूनि आहे अमुचा अभिमान ।
मृत्युंजय आम्ही, आम्हाला कसले कारागार ?॥

त्याला आपल्या परिस्थितीची पूर्णपणे जाणीव आहे. त्याने स्वतः होऊन या खाईत उडी टाकली आहे. तो स्वतःशीच म्हणतो, ध्येयपथावर निखारे पसरून मी त्यावरून बेहोष होऊन धावलो अन्–

'कधी न थांबलो विश्रांतीस्तव पाहिले न मागे ।
बांधु न शकलो प्रीतीचे वा कीर्तीचे धागे ।
एकच तारा समोर आणिक पायतळी ।
अंगार होता पायतळी अंगार ।

या यज्ञात त्याला आपल्या सर्वस्वाचा होम करावा लागला आहे. पण त्याला त्याचा खेद नाही. कारण सावरकरांच्या म्हणण्याप्रमाणे–

'बुध्याचि वाण धरिले करि हे सतीचे' ।

अशा वृत्तीचा तो क्रांतिकारक आहे. त्याला कशाचीही भीती वाटत नाही. उद्या त्याचे आयुष्य संपणार आहे. तो या कारागृहातून बाहेर जाऊ शकत नाही, म्हणून तो आपल्या श्वासांना सांगतो, 'तुम्ही बाहेर जा आणि आईला सांगा– 'तुझी ही मुले तुझ्या मुक्तीचे वेड धरल्यामुळे वेडी ठरली. तुझा ध्वज हातात धरला म्हणून त्याच हातात बेड्या आल्या. पण आई, त्यांना खात्री आहे, की साऱ्या जगाने जरी त्यांना वेडे म्हटले तरी तू तुझ्या या वेड्या लेकरांना जवळ करशील.' आणि खरंच आहे हे ! अखेरीस मृत्यूनंतर मातीतच माती मिळणार आहे. मुले आईशी एकरूप होऊन जाणार आहेत.

आईला निरोप दिल्यावर क्रांतिकारकाच्या मनाला आलेले थोडेफार नैराश्य संपते व तो म्हणतो–आईला म्हणतो, 'आई तू रडू नकोस.' कारण,

'रात्रीच्या गर्भांत उद्याचा असे उषःकाल ।'

आणि खरंच आहे. हे विनायकही म्हणतात–

'रात्र सरे तेव्हा उगवे दिनही पूर्ववाटे ।

आम्ही गेल्यावर आमच्या मागे कोण हा क्रांतीचा दीप तेवता ठेवणार ? अशी शंका मनाला वाटून जाईल– पण क्षणभरच ! कारण,

'सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते ।
उठतिल त्या ज्वालातूनी भावि क्रांतिचे नेते ॥

हा दीप तेवता ठेवण्यासाठी आमच्या पाठोपाठ अहिरावण-महिरावणासारखे अनेक वीर तयार होतील. त्याची तुला काळजी नको. आता तू खात्रीने मुक्त होशील.

मग त्याच उल्हसित वृत्तीत तो मृत्यूला म्हणतो, 'हे मृत्यू, तू आता ये. या बळीच्या गळ्यावर फास टाक. आता गिधाडांनो खुशाल या. तो सांगतो–

" शरिराचा कर सुखेनैव– या सुखेनैव संहार ।
मरणा सुखेनैव संहार ॥

मृत्यूला असे आव्हान करण्यास तो भीत नाही. कारण जगाच्या रंगभूमीवरील त्याचे काम आता संपले आहे. त्याच्या चित्तावरचा भार आता हलका झाला आहे. ज्या क्रांतीमुळे त्याला मरण येणार

आहे ती क्रांती त्याला अत्यंत प्रिय आहे. आणि म्हणूनच तो म्हणत रहातो–

'गर्जा जयजयकार, क्रांतिचा गर्जा जयजयकार'।

कवीने या कवितेत फक्त या क्रांतीवीराची कथा सांगितलेली नाही. या क्रांतिवीराने जी वाट पाडून ठेवली आहे त्याच वाटेने जा असा कवी यातून भारतीय तरुणांना संदेश देतात. क्रांतीचा जयजयकार करा हेच त्यांचे सांगणे आहे. अशा या रणगीताने अनेकांचे राष्ट्रप्रेम जागृत होऊन देशासाठी ते सर्वस्वाचे बलिदान करण्यासाठी तयार झाले यात नवल ते काय? या क्रांतिवीरांचे हे बलिदान परिणामी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यास कारणीभूत ठरले. या क्रांतिवीरांची आपण सतत जाणीव ठेवली पाहिजे. आज आमच्या देशात दारिद्र्य, बेकारी अशी अनेक संकटे 'आ' वासून उभी आहेत. अनेकजण म्हणतात की, पारतंत्र्यात हे तरी नव्हते. जे हे बोलतात त्यांचा धिक्कार असो. त्यांनी निदान या क्रांतिकारांची तरी जाणीव ठेवावी. त्यांनी आपल्या सर्वस्वाची राख रांगोळी केली ती कशासाठी, हे त्यांनी ध्यानी आणावे. आज देशात उभ्या राहिलेल्या संकटांचा बीमोड करण्याचा प्रयत्न करणे हे आमचे कर्तव्य. महागाईच्या अन् बेकारीच्या भस्मासुराला स्वतःच्याच डोक्यावर हात ठेवावयास लावणे हे आमचे कर्तव्य आहे. ते पार पाडल्यानेच या क्रांतिकारकांचे ऋण अंतशः फिटेल, व त्यासाठी हे रणगीत आम्हाला सदैव स्फूर्ती देईल.